**नि.फौ.प्र.क्र.२०१/२०२१** **निशाणी क्र.५३**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन</u>**

नाव – शुभम संजय चव्हाण वय – २० वर्षे

राहणार – कारखाना रोड, अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर.

प्र.१ तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही बांधील नाही, जर प्रश्नाचे उत्तर चुकले तर त्यासाठी तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही, पण तुम्ही दिलेली उत्तरे ही विचारात घेतली जातील, हे समजले काय ?

उत्तर होय

प्र.२ साक्षीदार क्र.३ पो.कॉ.संदिप उत्तम भोसले यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २५.०५.२०२१ रोजी ते अकोले पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन नेमणुकीस होते. त्यावेळेस वरिष्ठांच्या सांगण्यावरुन रात्रीचे पेट्रोलिंग करणेकामी ते सरकारी वाहन क्र.एम.एच.१६–सी.व्ही.८९३ ने पोलीस स्टेशनवरुन रवाना झाले. त्यावेळेस पहाटे ०४.०० वाजता ठाणे अंमलदार सहाय्यक फौजदार सय्यद यांचा फोन आला व त्यांनी त्यांना सांगितले की, त्यांना अहमदनगर कंट्रोलरुमधून फोन आला व त्यांना कळविण्यात आले की, अकोले येथील मार्केट यार्डच्या पाठीमागे ४०७ टॅम्पो ज्याचा कमांक ५०३३ हा वाळूने भरलेला टॅम्पो असून तुम्ही तेथे जावून खात्री करा, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यावेळी ते अकोले येथे पेट्रोलिंगच करत होते. त्याचवेळेस ते प्रवरा नदीच्या कडेला गेले असता त्यांना गाडी क्र.एच.एच.१७–बी.वाय. ५०३३ दिसली व त्यामधील गाडी चालकास म्हणजेच तुम्हाला तुमचे नाव गाव विचारले असता तुम्ही तुमचे नाव शुभम संजय चव्हाण असे सांगितले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.४ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी तुम्हाला गाडीच्या मागील हौदातील असलेल्या वाळूबाबतच्या परवान्याबाबत विचारणा केली असता तुम्ही वाळू वाहतुकीचा परवाना नसल्याचे सांगितले. त्या गाडीत त्यांनी साधारण एक ब्रास वाळू पाहिली. ती गाडी ही विटकरी रंगाची होती. त्यानंतर त्या वाहतुकीबाबत संशय आल्याने त्यांनी तुम्हास ताब्यात घेतले व गाडीसह पोलीस स्टेशनला आणले व तुमचेविरुध्द अकोले पोलीस स्टेशनमध्ये निशाणी ३५ वरील फिर्याद दाखल केली व त्यानुसार निशाणी ३६ वरील प्राथमिक खबरी अहवाल नोंदविण्यात आला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.५ साक्षीदार क्र.५ सोमनाथ मंगळा पटेकर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २५.०५.२०२१ रोजी रात्री २३.०० ते पहाटे ०५.३० वाजेपर्यंत ते व पो.कॉ.संदीप भोसले असे मिळून सरकारी वाहन क्रमांक एम.एच.१६–सी.व्ही.०८९३ मधून अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना पोलीस ठाणे अंमलदार सहाय्यक पोलीस फौजदार सय्यद यांनी फोन करून कळविले की, अहमदनगर येथील कंट्रोल रुम मधून फोन आला आहे की, मार्केट यार्ड येथे वाळू

भरलेला एक टेम्पो उभा आहे. त्यावेळी ते त्या रस्त्यावर पेट्रोलिंग करीत होते. त्यांना तो टेम्पो दिसून आला. तो टेम्पो टाटा कंपनीचा मॉडेल ४०७ नोंदणी क्रमांक एम.एच.१७–बी.वाय.५०३३ असा होता. त्या टेम्पोच्या चालकाला म्हणजेच तुम्हाला त्यांनी तुमचे नाव, गाव विचारले असता तुम्ही तुमचे नाव शुभम संजय चव्हाण, रा.कारखाना रोड असे सांगितले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.६ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी त्या टेम्पोची पाहणी केली असता त्यामध्ये सुमारे एक ब्रास वाळू होती. त्यांनी तुम्हाला परवान्याबाबत विचारले असता तुम्ही तुमच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. त्यामुळे, ते तुम्हाला टेम्पो व त्यातील वाळूसह अकोले पोलीस ठाणे येथे घेवून आले. पो.कॉ.श्री.संदीप भोसले यांनी तुमचेविरूध्द फिर्याद दाखल केली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.७ साक्षीदार क्र.६ महेश सिताराम आहेर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.०५.२०२१ रोजी ते अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी तत्कालीन ठाणे अंमलदार सहाय्यक पोलीस फौजदार सय्यद यांनी निशाणी पी–४८ वरील वरिष्ठांच्या लेखी आदेशाने गु.र.नं.१७१/२०२१ चा तपास त्यांच्याकडे वर्ग केला. त्या आदेशासोबत त्यांना एफ.आय.आर.ची प्रत, दैनिक अहवाल, फिर्याद ही कागदपत्रे प्राप्त झाली. त्यांनी त्या कागदपत्रांचे अवलोकन केले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.८ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.०५.२०२१ रोजी ते तुम्हापैकी आरोपी क्र.१ ला सोबत घेवून घटनास्थळी गेले. त्यांनी तेथे दोन पंचांना बोलावून घेतले. तुम्ही जेथून वाळू भरली होती, ते सोनेवाडी येथील यमुना नदीचे पात्र दाखविले. त्या ठिकाणी वाळूचे ढीग व काही ठिकाणी खड्डे पडले असल्याचे दिसून आले. त्यानुसार त्यांनी दोन पंचांसमक्ष निशाणी पी–८९ वरील घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. ते तुम्हाला पुन्हा अकोले पोलीस ठाणे येथे घेवून आले. तेथे त्यांनी तुम्हापैकी आरोपी क्र.१ यांचा जबाब नोंदविला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.९ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २७.०५.२०२१ रोजी त्यांनी दोन पंचांसमक्ष गुन्हयातील टाटा कंपनीचा ४०७ मॉडेलचा चॉकलेटी रंगाचा टेम्पो व त्या टेम्पोला जोडलेला पिवळ्या रंगाचा हौदा नोंदणी क्रमांक एम.एच.१७–बी.वाय.५०३३ व त्यातील सुमारे एक ब्रास वाळू यांचा निशाणी पी–५० वरील जप्ती पंचनामा तयार केला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१० यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तुम्हापैकी आरोपी क्र.१ यांचेकडे चौकशी केली असता तो टेम्पो तुम्हापैकी आरोपी क्र.२ शंकर खंडू हासे, रा.म्हाळादेवी यांचा असल्याचे सांगितले. तुम्हापैकी आरोपी क्र.१ ने त्यांना सांगितले की, तुम्हा पैकी आरोपी क्र.२ शंकर खंडू हासे यांनी तुम्हाला वाळू भरून आणण्यास सांगितले होते व ती वाळू कोठे खाली करायची आहे, याबाबत ते तुम्हाला सांगणार होते. दिनांक २८.०५.२०२१ रोजी त्यांनी तुम्हापैकी आरोपी क्र.२ टेम्पो

मालक शंकर खंडू हासे यांना अटक करून न्यायालयासमोर हजर केले. त्यांनी तुमच्याकडून त्या टेम्पोचे आर.सी.बुक जप्त केले. दिनांक ३१.०५.२०२१ रोजी त्यांनी मा.तहसिलदार, अकोले यांना या प्रकरणाबाबत अहवाल सादर केला. त्यांनी संबंधित साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.११ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तपासाअंती तुम्ही आरोपींनी एकमेकांशी संगनमत करून सोनेवाडी, ता.सिन्नर, जि.नाशिक येथील यमुना नदीच्या पात्रातून वाळूची चोरी करून ती वाळू टेम्पो क्रमांक एम.एच.१७–बी.वाय.५०३३ मधून अकोले शहराच्या हद्दीतून वाहतूक करीत असताना मिळून आल्याने त्यांनी तुमचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१२ तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचे आहेत काय ?

उत्तर नाहि.

प्र.१३ तुम्हाला साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर नाहि.

प्र.१४ तुम्हाला केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर आमच्याविरुध्द खोटी केस दाखल केली आहे.

--------------

आरोपी

समक्ष

9.3.26

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले**

**दिनांक – ०९.०३.२०२६**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वर नमुद आरोपीचा जबाब माझे समक्ष त्याच्या सांगणेप्रमाणे खरा व बरोबर नोंदविणेत आला आहे.

समक्ष

9.3.2026

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – ०९.०३.२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले**